महाराष्ट्र शासन : वृत्त विशेष
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
**जिल्हा माहिती कार्यालय, सिंधुदुर्ग.**
मुख्य प्रशासकीय इमारत, सी ब्लॉक, पहिला मजला, सिंधुदुर्गनगरी - ४१६८१२
ई-मेल पत्ता :- diosindhudurg@gmail.com
दूरध्वनी : (०२३६२) २२८८५९ फॅक्स : २२८६८४

वृ.वि.क्र. ७८४ दि. ८ सप्टेंबर २०१०

# शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना स्थानिक सुट्ट्या

सिंधुदुर्गनगरी, दि. ८ : शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना स्थानिक सुट्ट्या लागू आहेत. तथापि, गणेश चतुर्थी, दिवाळी व उन्हाळी सुट्टी या दिर्घ कालावधीच्या सुट्ट्या लागू होत नाहीत. याबाबत माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांनी पूर्वीप्रमाणेच नियमानुसार देय सुट्ट्या मंजूर कराव्यात, असे बी. जी. शेळके, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी प्रसिध्दीस दिलेल्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

००००० 

वृ.वि.क्र. ७८५

# माजी सैनिकांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती योजना

सिंधुदुर्गनगरी, दि. ८ : माजी सैनिक, वीर पत्नी, माजी सैनिकांच्या पत्नी यांच्या पाल्यांकरिता कल्याणकारी निधीमधुन लागू असलेल्या शिष्यवृत्ती योजनेचे विहीत नमुन्यातील अर्ज जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात उपलब्ध आहेत.

शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेऊ इच्छिणारे माजी सैनिकांचे पाल्य सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी, १२ वी अथवा, पदवी परीक्षा कमीत कमी ६० टक्के गुणाने उत्तीर्ण होऊन शैक्षणिक शाखामधून पुढे सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेत असावे.

माजी सैनिक ओळखपत्र, साध्या कागदावरील मागणी अर्ज, परीक्षा उत्तीर्णतेच्या गुणपत्रीका व पुढे शिकत असल्याबाबतचे शाळेचे प्रमाणपत्र (बोनाफाईड सर्टिफिकेट) या कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या झेरॉक्स प्रतींसह परिपूर्ण भरलेले अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर २०१० असून, एखाद्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश उशिरा प्राप्त झालेला असल्यास प्रवेश मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त माजी सैनिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद तुंगार यांनी केले आहे.

००००० 

रासम/२०१००९०८